P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – १६/०८/२०२४

## दि. १५/०८/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ८९८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १२३, ३०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १४/०८/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा.ते ०९.०० वा.चे दरम्याण फ्लॅट नं. एल-१२०३, स्विस काऊंटी सोसायटी, थेरगाव पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १५/०८/२०२४ रोजी २३/२१ वा.

फिर्यादी :- श्री वासुदेव भालचंद्र आडवाणी वय ६८ वर्षे धंदा-कापड व्यवसास रा. फ्लॅटनं. एल-१२०३, स्विस काऊंटी सोसा थेरगाव पुणे

आरोपी :- रफिक उर्फ समीर जमादार वय-४२ वर्षे अंदाजे मो. ८१८०९८९४३०, ९१७५५८९४३०, ७४१०७२९४३० (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही)

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे घरी बेडरुममध्ये फिर्यादीचा ड्रायव्हर नमुद आरोपी याने फिर्यादीचे बी.पी.शुगरच्या औषधामध्ये कोणते तरी गुंगीकारक औषध/पदार्थ मिसळुन ते फिर्यादीला प्यायला दिले त्यामुळे फिर्यादीला गुंगी येवुन फिर्यादी बेशुध्द होवुन झोपी गेल्यानंतर नमुद आरोपी याने फिर्यादीचे हातातील ३,५०,०००/- रु किंमतीचे साडे चार तोळे वजनाचे सोन्याचे ब्रेसलेट,१,८०,०००/- रु किंमतीचे गळ्यातील अडीच तोळ्याची सोन्याची चैन,१,००,०००/-रु किंमतीचे चैनमधिल डायमंडचा गणपती, ६०००/-रु पाकीटातील रोख रक्कम, ५०००/- रु किंमतीचे गाडीची चावी, गाडीचे आर.सी.बुक (स्मार्टकार्ड), बॅंक ऑफ बडोदाचे क्रेडीट कार्ड असे एकुण ६,४१,०००/- रु किंमतीचे हे सर्व साहीत्य चोरी करुन निघुन गेला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पोटे ८७८८६५९४७५

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ३६२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११७,३५२ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) (३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १५/०८/२०२४ रोजी सकाळी ०८/३० वाजण्याच्या सुमारास त्रीवेणीनगर चौकाकडुन, भक्ती शक्ती चौकाकडे जाताना, भक्ती शक्ती पुलाचे सुरवातीला, निगडी, पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १५/०८/२०२४ रोजी २२/५६ वाजता

फिर्यादी :- अजिंक्य संजय साळुंखे वय २५ वर्षे, धंदा नौकरी रा. घारजाई हौसींग सोसा.,ज्ञानदिप शाळेजवळ रुपीनगर, निगडी,पुणे.

आरोपी :- आसीफ रहीस खान वय २९ रा. फातीमा मस्जीद जवळ, ओटास्कीम, निगडी ,पुणे. **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचा मित्र नामे साहील राऊत असे स्विप्ट गाडी क्र. एम.एच.१२ क्यु.टी. ७३१४ हिचेमधुन भक्ती शक्ती चौकाकडुन त्रीवेणीनगर चौकाचे दिशेने जात असताना अंकुश चौक येथे फिर्यादीचे गाडीला रिक्षा क्र. एम.एच. १२ एस.के. ०५४५ हीने कट मारुन भक्ती शक्ती ब्रीजच्या बाजुने निघुन जात असताना साहील राऊत याने फिर्यादीचे गाडीने त्याचा पाठलाग केला व त्यास भक्ती शक्ती ब्रीजच्या सुरवातीला थांबवुन आमच्या गाडीला कट का मारला ? असे विचारले असता त्यांच्यामध्ये एकमेकांना शिवीगाळ होऊन शाब्दीक वाद झाला. वाद चालु असताना त्या रिक्षा क्र. एम.एच. १२ एस.के. ०५४५ वरील चालक नमुद आरोपी याने त्याचे रिक्षामध्ये असलेला लाकडी बांबु काढुन फिर्यादीचे हातावर व पाठीवर मारला तसेच फिर्यादीचा मीत्र नामे साहील राऊत याला देखील लाकडी बांबुने मारुन जखमी करुन दुखापत केली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा शिंदे ९८२३७२५५६९

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ३६१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११७, ११५ (२), ३५१ (२), ३५२, १२६ (२),३(५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) (३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १५/०८/२०२४ रोजी सकाळी ०८/३० वा.चे सुमारास ,ओटास्क्रिम,निगडी,पुणे. येथील अंकुश चौक येथील कमानीजवळ भक्ती शक्ती ते तळवडे रोड क्रास करुन भक्ती शक्तीकडे जाणारे ब्रिजचे जवळ. |
| गुन्हा दाखल | :- | दि १५/०८/२०२४ रोजी २२/३५ वा |
| फिर्यादी | :- | असीफ अहमद रहिसखान वय ३० वर्षे,व्यवसाय रिक्षा चालक,रा. आझाद चौक, फातिमा मजिस्दचे मागे,शंकर मंदिर शेजारी, ओटास्क्रिम, निगडी, पुणे. |
| आरोपी | :- | १) साहिल मोनिष राउत रा.ओटास्क्रिम, निगडी,<br>२)अजिंक्य संजय साळुंके रा.रुपीनगर, तळवडे, पुणे. **आरोपी अटक आहे.** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी ओटास्क्रिम, निगडी, पुणे. येथील अंकुश चौक कमानीजवळ भक्ती शक्ती ते तळवडे रोड क्रास करुन भक्ती शक्तीकडे जाणारे ब्रिजचे जवळ आले असताना स्विफ्ट कारचा नं.एमएच १२ क्युटी ७३१४ मधील इसम आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादी यांना अडवुन फिर्यादी यांनी त्यांचेकडे बधितले तसेच त्यांचे कारला कट मारण्याचे कारणावरुन चिडुन जावुन फिर्यादी यांना लाकडी बांबुने व लोखंडी पाईपने डोक्यात, तोंडावर, पाठीवर, कानावर, हातावर मारहाण व शिवीगाळ करुन पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिली.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा बाबा ८२३७४०५४६० |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ३७५/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १९४(२),१८९(२), १९०,१९१(२) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १५/०८/२०२४ रोजी १८/४५ वा सुमारास पोलीस ठाण्यासमोर (आवारात) |
| गुन्हा दाखल | :- | दि १५/०८/२०२४ रोजी २१/५२ वा |
| फिर्यादी | :- | पोशि/ २०९३ राहुस अर्जुन वाघमारे, वय- ३६ वर्ष, नेमणुक देहुरोड पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड.पुणे |
| आरोपी | :- | १) अमर ब्रम्हदेव कसबे, वय- ३८ वर्ष, रा.भीमाशंकर सोसायटी, जय मल्हार कॉलनी, देहुगाव २) प्रेम ब्रम्हदेव कसबे, वय-४३ वर्ष, रा.सदर. ३) आशीष नागेश वाघमारे, वय-२४ वर्ष, रा. सदर ४) विकास रामकृष्ण साठे, वय- २८ वर्ष रा. विठ्ठलवाडी,पाण्याच्या टाकीजवळ, देहुगाव (पाहीजे आरोपी) (५) अंजली विकास साठे, वय- २६ वर्ष, रा. विठ्ठलवाडी,पाण्याच्या टाकीजवळ, देहुगाव ६) आशा बंडु चौधरी, वय-३६ वर्ष, रा. विठ्ठलवाडी,देहुगाव ७) रेखा प्रेम कसबे, वय-३३ वर्ष, रा.भीमाशंकर सोसायटी, जय मल्हार कॉलनी, देहुगाव ८) प्रीती अमर कसबे, वय- ३३ वर्ष, रा. भीमाशंकर सोसायटी, जय मल्हार कॉलनी, देहुगाव |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे ठाणे अंमलदार मदतणीस म्हणुन देहुरोड पोलीस स्टेशन येथे हजर असताना वेळ १८/४५ वा सुमारास पोलीस ठाण्यास आलेल्या तक्रारदार व विरोधक महीला यांचे परस्पर अदखलपात्र स्वरुपाचे गुन्हे दाखल केल्यानंतर त्यांना शांतता राखणेबाबत ठाणे अंमलदार यांनी समज दिल्यानंतर त्यांना वापस घरी जाण्याबाबत सांगितले असताना सदर तक्रारदार व विरोधक व त्यांचे नातेवाईक यांनी पोलीस स्टेशन आवारामध्ये गैरकायद्याची मंडळी जमवुन आपापसात एकमेकांना हाताने मारहान करुन शिवीगाळ करुन सार्वजनीक शांतता बिघडवली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खणसे ९८२३२४७७४१ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी३२७/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १०६(१), २८१,१२५, (अ), १२५(ब),३२४ (२), मोटर वाहन कायदा कलम १८४, ,११९/१७७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १५/०८/२०२४ रोजी अंदाजे ०९.१५ वा चे सुमारास गोविंद गार्डन चौकाजवळ, भारती हॉस्पिटल समोरील बी.आर.टी. मार्गामध्ये पिंपळे सौदागर, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १५/०८/२०२४ रोजी २३/२८ वा. |
| फिर्यादी | :- | राहुल हरीनाथ सुतार, पोलीस हवालदार ब.नं.१०७३, नेमणुक- सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पुणे |
| आरोपी | :- | १)सियाज कार क्र. एम.एच.२६.ए.के.६७३२ चा चालक नामे शिवकुमार बाबुराव कोडगीरे,<br>२)यामहा आर. १५ मोटारसायकल क्र. एम.एच.१४ एल.आर. ७२०० चा चालक नामे पार्थ वैभव काळे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी गोविंद गार्डन चौकाजवळ, भारती हॉस्पिटल समोरील बी.आर.टी. मार्गामधुन सियाज कार क्र. एम. एच. २६. ए.के. ६७३२ चा चालक आरोपी क्र १ व यामहा आर. १५ मोटारसायकल क्र. एम.एच.१४ एल.आर. ७२०० चा चालक आरोपी क्र २ यांनी वाहतुक मार्गात वाहने नियमांचे उल्लंघन करुन त्याचे ताब्यातील वाहने बेदरकारपणे निष्काळजीपणाने व हयगयीने चालवुन अपघात करुन स्वतःचे व इतरांचे जिवीतास धोका निर्माण करुन मोटारसायकल वरील मागे बसलेला हरिष शर्मा ह्याचे मृत्युस व गंभीर दुखापतीस कारणीभुत झाले व गाड्यांचे नुकसान केले म्हणुन म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोउपनि म्हैशाळे ८६००१०४५६६ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३११/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम २८१, १२५ (अ), १२५ (बं), ३२४ (४) (५) मो.वा.का. १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३१/०७/२०२४ रोजी दुपारी ०३:४५ ते ०३:५० वा.चे दरम्यान बालाजी प्युवर व्हेज हॉटेल,रावेत येथील समोरील रोडवरील चौकात ता.हवेली जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १५/०८/२०२४ रोजी २३.३५ वा |
| फिर्यादी | :- | रोहीत संजय बद्देलवार वय २२ वर्षे धंदा शिक्षण रा.अ सी/१०१ रोहन अनंता सोसायटी, जेएसपीएम कॉलेज अपोजिट ,पुणे-मुंबई हायवे रोड, ताथवडे ता.मुळशी जि पुणे , मुळगाव-रा मुल, सीबीएससी स्कुल जवळ,वार्ड नं १४ ता.मुल जि चंद्रपुर |
| आरोपी | :- | एक महीला तिचे नाव व पत्ता माहीत नाही |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे पल्सर मो.सा नंबर एमएच ३४/सीबी/२९३६ यावरुन मो.सा वरुन भोंडवे चौक येथील गॅरेज येथुन निघुन बालाजी प्युवर व्हेज हॉटेल, रावेत ता.हवेली जि पुणे येथे दुपारी ०३:४५ ते ०३:५० वा .चे दरम्यान आले त्यावेळी व्हेन्यु हुंडाई कार नं एमएच/१४/जेआर/९०२२ वरील कार चालक महिला नाव पत्ता माहीत नाही ही अचानक बालाजी प्युअर व्हेज हॉटेल चे समोरील रोडने येवुन मुख्य /मेन रस्त्याने जाणारे-येणारे वाहनांकडे दुर्लेक्ष करुन मुख्य चौक ओलांडत असताना वाहतुकीचे नियमांकडे दुर्लेक्ष करुन, हायगयीने, निष्काळजीपणाने कार चालवुन चौकात अचानक थांबल्याने फिर्यादी यांची पल्सर मो.सायकल सह फिर्यादी कारला धडकल्या मुळे फिर्यादीचे डोकीस, कपाळाला मार लागण्यास, उजवा हात फॅक्चर, व जांगेतील अवघड भागाचे पेलविक हाडास गंभीर जखमी करणेस तसेच फिर्यादीचे पल्सर मो.सा हिचे पुढील मिटर रिडींग बॉक्स, हेडलाईट ,इंडीकेटर दोन्ही ,दोन्ही शॉकअपसर बेंड होऊन नुकसान झाले आहे व कार व्हेन्यु हुंडाई कार नं एमएच/१४/जेआर/९०२२ हिचे चालक साईडचा दरवाजाचे खालील भाग,आणि कारचे उजव्या बाजुचे पुढील चाकाचे वरील फेंडर चे नुकसान करणेस महिला कार चालक कारणीभुत झाली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ पोटघन ९९२३१८८४२४ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ४७०/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १३/०८/२०२४ रोजी सायं १९/३० वा.ते दिनांक १४/०८/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वा. चे दरम्यान रॉयल रेसीडेन्सी, से. नंबर १८, फुलेनगर चिंचवड पुणे. येथील रोडच्या कडेवरुन |
| गुन्हा दाखल | :- | दि १५/०८/२०२४ रोजी १७/४२ वा |
| फिर्यादी | :- | श्री.सचिन संतराम हातागळे वय ३६. वर्षे, धंदा.ड्रायव्हर रा. रॉबर्ट यांची रुम,नंदनवन सोसायटी, अंगणवाडीरोड, सिध्दीविनायक पब्लीक स्कुल जवळ, मोरेवस्ती चिखली पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा १,५०,०००/- रुपये किंमतीचा एक अशोक लेलंन्ड कंपनीचा चारचाकी टेम्पो नं एम एच १४ एफ टी ००८७ हा पार्क करुन लॉक करुन ठेवला असता तो कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या संमती शिवाय, मुद्दाम व लबाडीचे इरादयाने चोरुन नेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ सुळ ९९२२९६२७४१ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ४७२/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)(३) सह १३५, प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १५/०८/२०२४ रोजी १७.०० वाजताचे सुमारास घरकुल चौक, चिखली पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १५/०८/२०२४ रोजी २३/४२ वाजता |
| फिर्यादी | :- | बाबासाहेब वाल्हाजी गर्जे, वय ४३ वर्ष, पोलीस हवालदार बक्कल नंबर ४७८ नेमणुक चिखली पोलिस स्टेशन पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | मुस्तफा मकबुल पटेल वय २१ वर्षे, राह. विकासनगर, हिराबाई झोपडपट्टी, बिलाल मस्जीद जवळ, कासारवाडी, पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपीत याने त्याचे इन्स्टाग्राम प्रोफाईल आयडी king_maker_mustya_३०२च्यायुआरएललिंकhttps://www.instagram.com/king_maker_mustya_302?igsh=MWxrZzAyY2FpcTdhbw== या इन्स्टाग्राम पेजवर कोयता, पालघन, अशी प्राणघातक हत्यारे हातामध्ये घेवुन स्वतःचे काढलेले फोटो पोस्टपोस्ट करुन आज दिनांक १५/०८/२०२४ रोजी १७.०० वाजताचे सुमारास आरोपीत याने मा.पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड यांचे आदेशान्वये पिंपरी चिंचवड शहरात पोलीस आयुक्तलय कार्यक्षेत्रात कोणतेही शस्त्रे, अस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, लाठी, बेंदुका ड्विंवा शारीरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे अथवा बाळगणे बाबत मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग करुन, अवैधरित्या एक ३००/- रु किंमतीचे धारदार लोखंडी कोयता बाळगले स्थितीत मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा काळोखे ९९६७९६६४९२ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ४९०/२०२४ भारतीयन्याय संहीता कायदाकलम ३०५ (अ) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १५/०८/२०२४ रोजी रात्री १२:३० वा ते सकाळी १०:२० वाजणेचे दरम्यान फिर्यादी हे सध्या कोर्स कामी राहत असलेल्या ब्लॉक नं जी-१५८/१, फॉरेन ऑफिसर रुम सिएमई दापोडी पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि १६/०८/२०२४ रोजी ००/४० वा. |
| फिर्यादी | :- | ताशी दोरजी वांगचुंग वय २३ वर्ष धंदा- (आर्मी) लेफटनंट रा- ब्लॉक नं जी-१५८/१, फॉरेन ऑफिसर रुम सिएमई दापोडी पुणे. मुपो. उरुकता. जि. भुमतांग, देश - भुटान, |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मालकिचा ६०,०००/- रु किंमतीचा ॲपल कंपनीचा १५ प्रोमॅक्स मॉडेलचा पांढरे रंगाचा आयफोन मोबाईल व ८०००/- रु किंमतीचा ॲपल कंपनीचा बिच मॉडेलचा एअर फोन असे ते राहत असलेल्या खोलीचा दरवाजा अर्धवट उघडा असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने आत प्रवेश करुन फिर्यादी यांचे संमती शिवाय मुददाम लबाडीचे इरादयाने चोरी करुन घेवुन गेलेला आहे, म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मोहारे ७९७२३३६२७० |